# संरक्षण

रतीला बघितलं की नंदूचा कायम गोंधळ व्हायचा. तिचं रूप, नाक, डोळे रंग अगदी भारतीय, तर वागणं अगदी पाश्चात्त्यासारखं होतं. त्याच्या ओळखीच्या भारतीय मुलींच्या साच्यात रती बसत नव्हती. तिच्या बोलण्यात, हसण्यात प्रांजळ दिलखुलासपणा होता. भारतीय आई वडिलांची अमेरिकेत वाढलेली रती अनिर्बंध व मुक्त होती. पुरुष्यांच्या रूपाविषयी बोलताना, त्यांच्या चालू संशोधनाविषयी चर्चा करताना किंवा सामाजिक परिस्थितीविषयी बोलताना ती बेफिकीरीने तिला योग्य व खरं वाटेल तेच बोलत असे. प्रोफेसरांना काय वाटेल याचा किंवा दुसऱ्यावर छाप मारण्याचा तिचा हेतू नसायचा हे उघडच होतं. शिवाय तिच्या बोलण्याचे सुपरिणाम होतात की दुष्परिणाम होतात ह्याचीही तिला पर्वा नव्हती.

तिच्यात आणि इतर आर्किऑलॉजीच्या संशोधनासाठी त्या जंगलात येऊन देवळासभोवती तंबू ठोकून राहिलेल्या विद्यार्थ्यांत आणखी एक फरक होता. त्या संशोधनात तिला खरा खरा रस होता. बाकी बहुतेक विद्यार्थी डिग्री मिळवायची किंवा कॉलेजमध्ये दिवस काढण्याऐवजी संशोधन करत थोडे दिवस जंगलात मजेत काढायचे ह्या हेतूने तिथे आलेले होते. चार महिन्यांत बहुतेक कंटाळले होते. पण रती मात्र कंटाळली नव्हती. तिच्या उत्साहाचा पूर पहिल्या सारखाच वाहात होता.

भारतात, एका जंगलात अनेक शतकापूर्वी गाडलेलं हे जुनं देऊळ व मंडप सापडलं होतं. देवळाभोवती रान माजलं होतं. त्याचा मधला मोठा मंडप खोदून झाला होता. त्या कामालाच दोन वर्ष लागली होती. मंडपाभोवती लहान लहान अनेक मंडप होते. कित्येकात भिंतीवर कोरून काढलेल्या स्त्री-पुरुषांच्या आकृत्या होत्या. काही मंडपांत नुसते पुतळे उभे केलेलं होते. कोरलेले पुतळे व सुट्टे पुतळे हे त्यावेळच्या कलाकाराच्या अप्रतिम कसबाची साक्ष देणारे होते. चुण्या सळसळत आहेत असा स्त्रीच्या तलम वस्त्राकडे बघून भास व्हायचा. कमरेवरच्या घड्यातलं पाणी डुचमळून सांडायलाच आलंय असं वाटायचं. भरलेले डोळे वाहाणार, उपसलेली तलवार आपल्यावर वार करणार, उधळलेला हत्ती लाथ मारणार असं जाणवायचं. साऱ्या वातावरणात एक प्रकारची गूढ, रहस्यमय स्तब्धता होती. एका काळची हाडामासांची जिवंत माणसं जागच्याजागी दगडाची होऊन युगान् युग उभी आहेत, असं बघणाऱ्यांच्या मनांत आल्याशिवाय राहात नसे.

रानात राहाणारे आदिवासी तर देवळाकडे फिरकायला तयार नव्हते. त्या पुतळ्यांत अजून धुगधुगता जीव आहे असचं त्यांचं म्हणणं होतं. 'त्यांना त्यांच्या खोल समाधीतून सर्वांनी खणून काढलं' हे फार अयोग्य झालं, असा त्यांचा विश्वास होता.

एकटी रती देवळात अगदी न घाबरता जायची. तिच्याबरोबर आलेली दोन अमेरिकन मुलं पण रात्री एकटी त्या देवळात जायला कबूल होत नसत. पण रतीच्या मनात भीतीचा अंशही नव्हता.

नंदूला तिने एक दोनदा म्हटलं, 'ह्या देवळात आल्यावर मला माझ्या घरीच परत आल्यासारखं वाटतं.'

'छे! भीती कसली? हे पुतळे तर माझ्या ऋणानुबंधातले आहेत. जरूर पडली तर ते माझं संरक्षण करतील.' असं काही तिने बोलून दाखवलं होतं.

नंदूला तशी त्या देवळाची थोडी भीती वाटत होती. पण त्याने ते कधीच कबूल केलं नव्हतं.

पुष्कळदा रती आणि ते दोघं अमेरिकन देवळात रात्र होईपर्यंत शिल्पांच्या आकृत्या काढत, पट्टीने मोजमाप घेत बसत. कधी कधी नंदू पण त्यांच्याबरोबर जात असे. त्यांच्यासारखं इंग्लिश बोलता यावं हा एक त्याचा अंतस्थ हेतु सुरवातीला होता. पण जसजसे दिवस जायला लागले तसं त्याला रतीविषयी आकर्षण वाटायला लागलं. आपलं तिच्यावर प्रेम आहे का? हे त्याला समजेना. तो आजवर कुठल्याही मुलीच्या प्रेमात पडला नव्हता. त्यामुळे हे नुसतं आकर्षण आहे का प्रेम आहे हे त्याला समजेना पण एवढं मात्र खरं की रात्रंदिवस त्याच्या डोळ्यासमोर रती दिसू लागली. तिच्या शरीराचाही त्याला मोह पडू लागला.

दिवसभर रतीच्या जवळ राहायचा प्रयत्न तो करू लागला. सकाळी दोन तास लेक्चर्स व दुपारी डेमॉन्स्ट्रेशन्स चाललेली असायची. विद्यार्थी तेव्हा हजेरी घेतली जायची म्हणून तिथे उपस्थित असायचे. रती तर कायम उपस्थित असायची. नंदू तिच्याभोवती तिथे घोटाळायचा. नंतर दिवसभर रती देवळात तिच्या कामात गर्क असायची. नंदू पण तिच्या भोवती काम करण्याच्या ढोंगाने रुंजी घालत राहायचा.

रती त्याच्याकडे फारसं लक्ष देत नव्हती. बोललीच तर ती देवळातल्या शिल्पाविषयी काही बोलत असे. एकदा ती त्याला हसून 'तुला खरा तुझ्या कामात रस नाही? मजा म्हणून आलायस ना इथे?' असं म्हणाली होती. पण तिने त्याला तिच्याभोवती रुंजी घालण्याला विरोध केला नव्हता. एवढ्यावरच नंदू सुरवातीला खूष होता.

रतीने लक्ष दिलं नाही तरी इतर विद्यार्थ्यांच्या लक्षात मात्र नंदूचं वागणं आलं. त्यांनी थट्टा करायला सुरवात केली. त्याच्याच तंबूत राहाणारे दोघे निरंजन आणि जयंता तर त्याला उघड उघड चिडवू लागले. एकदा तर त्यांनी रतीच्या देखत नंदूला चिडवलं. रती नुसती हसली. रतीला कुठे सिनेमाला किंवा हॉटेलात न्यावे अशी नंदूला इच्छा होती. पण अगदी जवळच्या खेड्यापासून ते कमीत कमी १०० मैल दूर होते. जीपने कच्च्या रस्त्यावरून धक्के व धुरळा खात जाण्याशिवाय त्यांच्या त्या चिमुकल्या जगापासून दूर जायला मार्ग नव्हता.

दिवसेंदिवस नंदूचं रतीविषयी आकर्षण वाढू लागलं. त्याच्या भावना रात्री विलक्षण तीव्र व्हायच्या. कधी कधी भावनांच्या आवेगाचा स्फोट होऊन आपलं मस्तक फुटणार आहे असं नंदूला वाटायचं. तो रात्र रात्र बसून राहायचा. त्याला रती हवी होती. त्याच्या मित्रांनी त्याला 'प्रेमरोग जडला आहे,' असं निदान केलं. नंदूचं जाग्रण, हरवल्यासारखं वागणं. रतीभोवती रुंजी घालणं हे त्याच्या तिच्यावर जडलेल्या प्रेमाची लक्षणं आहेत असं ते म्हणू लागले.

एके दिवशी रतीने त्याला सांगितलं की आठ दिवसांनी तिला घरी परत जायचं आहे. महिनाभर अमेरिकेत राहून ती परत येणार होती. मग ती दुसऱ्या कॉलेजात जाणार होती. कॉलेजचे विद्यार्थी असोत किंवा नसोत ती देवळात काम करतच राहणार होती.

आता मात्र नंदू विलक्षण अस्वस्थ झाला. रती त्याच्या हातातून कायमची निसटणार होती. कारण महिन्यानी तो व इतर कॉलेजचे विद्यार्थी कायम परत जाणार होते. त्यांचं इथलं खोदकामाचं शिक्षण संपलं होतं. पुढचे सहा महिने त्यांना दुसऱ्या ठिकाणी जायचं होतं...रतीला इथे परत भेटायला येणं अशक्य नसलं तरी कठीण होतं. हे स्थळ खूप दूर होतं. आणि त्याच्या गावातून एकट्याने इथे येण्यास पैसेही खूप खर्च करावे लागले असते. शिवाय कॉलेजही होतं.

उलटत्या दिवसाबरोबर नंदूच्या भावना आणखी तीव्र होत चालल्या. ती जाण्यापूर्वी एकदा तरी तिला आपली करावी अशी खोल इच्छा त्याच्या मनात घर करून बसली. आणि दिवस रात्र त्याला छळू लागली.

रती जाण्याच्या आदल्या दिवशी तर नंदूला 'आपण वेडाच होणार' असं वाटू लागलं. नऊच्या सुमाराला त्याने दोन्ही अमेरिकन मुलांना देवळातून बाहेर पडून त्यांच्या तंबूकडे जाताना पाहिलं. रती देवळात एकटीच होती. अर्धा तास नंदू डोकं दाबत आणि छातीची धडधड ऐकत बसून राहिला. एक मन म्हणत होतं, 'ही शेवटची संधी आहे. रती एकटी आहे.' दुसर मन म्हणत होतं, 'नको, नको तिथे गेलास तर तुझ्या भावना तुला आवरणार नाहीत.'

शेवटी पहिलं मन जिंकलं. हातात टॉर्च घेऊन नंदू देवळात आला. रती अगदी टोकाच्या, छोट्या, सर्वात शेवटी खोदून काढलेल्या घुमटीच्या आकाराच्या मंडपात काम करत होती. हे नंदूला ठाऊक होतं. देवळातल्या मुख्य मंडपात अंधारच होता. दूर खोल मिणमिणता उजेड दिसत होता. त्या दिशेने नंदू चालू लागला. त्याला दोन मंडप ओलांडल्यावर पाठमोरी कमनीय रती दिसली.

रतीने दोन मेणबत्या दरवाजात लावल्या होत्या. आणि बॅटरीच्या प्रकाशात तिचं चित्र काढण्याचं काम चालू होतं.

एकट्या रतीला पाहून नंदू देहभान विसरला आणि तिच्या दिशेने हळू चालू लागला. त्याच्या डोळ्यात वासना उफाळली होती. रती आपल्या कामात मग्न असावी. तिने वळूनही पाहिलं नाही. तिच्यावर मागून नंदू हात टाकणार एवढ्यात त्याला दूर अजून न खोदलेल्या सलग मंडपात अस्पष्ट दिवलीचा उजेड दिसला. नंदू डोळे विस्फारून पाहू लागला. त्या मंडपाच्या मधली खोदलेली माती नाहीशी झाली होती. पुढच्या लहान घुमटीसारख्या मंडपाच्या टोकाला एक स्त्रीचा व एक पुरुषाचा असे दोन पुतळे नंदूला दिसले. एकदम नंदूच्या लक्षात आलं; त्या स्त्रीत आणि रतीत विलाक्ष्ण साम्य होतं. तसेच मोठे डोळे, रेखीव भुवया, सरळ नाक, गोल चेहरा, कुरळे केस, कमनीय बांधा.

आणि एवढंच नव्हतं, ती स्त्री हळूहळू पुढे सरकत होती. तिच्या कमरेवरच्या घड्यातलं पाणी डुचमळून सांडत होत. शेजारच्या पुरुषाच्या रागीट डोळ्यांची उघडझाप होत होती. त्याचा तलवारीवरचा हात हळूहळू तलवार म्यानातून उपसत होता. एवढ्यात लगतच्या भिंतीवर कोरलेला साप सळसळत वेगाने उतरून नंदूच्या दिशेने येऊ लागला.

नंदू भीतीने बधीर झाला. त्याची दातखीळ बसली. डोळ्यांपुढे अंधार पसरला.

दुसऱ्या दिवशी नंदू जागा झाला तेव्हा त्याचा मित्र जयंता त्याच्याजवळ खुर्चीवर बसला होता. नंदूच डोकं खूप दुखत होतं. ‘मला क.......क काय झालं.?’ त्याने जयंताला विचारलं.

‘ठीक आहेस तू!’ जयंता म्हणाला.

“काल रात्री तू देवळात गेलास. थोड्या वेळाने “हेल्प हेल्प” असं ओरडत रती देवळातून धावत आली. तू तिच्या नकळत तिच्या मागे येऊन उभा होतास. तिथेच मोठ्यांदी “ओऽऽऽऽ”असं म्हणून तू चक्कर येऊन पडलास.”

‘आम्ही तुला उचलून आणलं. कँप नर्सने तुला रात्री तपासलं. तू ठीक आहेस असं ती म्हणाली. सकाळी आठ वाजता रती तुला पहायला आली होती. तिने तू झोपला आहेस म्हटल्यावर तुला उठवलं नाही. तुझा निरोप घ्यायला आली होती ती! जीपने ती अमेरिकेला निघून गेली.

नंदूला एकदम काल रात्रीची हकीगत आठवली आणि त्याच्या छातीत भीतीने परत कळ आली. बारा वाजता प्रोफेसर नंदूला बघायला आले. ‘ठीक दिसतोयस तू! परत पाठवायची जरुरी नाहीस वाटतय.’ ते म्हणाले.

मग त्यांनी नवी बातमी सांगितली.

‘आताच मी देवळाकडून आलो. नव्या मंडपाच्या दारातली माती आज सकाळी खोदली. फार सोपं होतं काम, आश्चर्य म्हणजे त्या मंडपातले बाई आणि पुरुषाचे पुतळे इतर मंडपासारखे भिंतीलगत नाहीत. साधारण भिंतीपासून दोन फुट दूर आहेत. शिवाय बाईच्या पुतळ्याखाली पाणी सांडलं होतं. छपरातून गळालं असावं. पुरुषाची तलवार म्यानातून थोडी बाहेर निघालीय. बाईच्या

मागच्या भिंतीवरची जागा मोकळी आहे. तिथे शेजारी साप कोरलेला नाही. त्या जागी आणखी एक वस्तू पण सापडली तिथे, छोटी दिवली. हे ऐकून नंदू थरथरायला लागला.

'नंदू, तू कां एवढा घाबरलास?'

प्रोफेसरांनी विचारलं. 'हरकत नाही. एवढी भीतीचं वाटतेय तर तुला परत पाठवतो.

रतीला पोचवून जीप परत येऊ दे. उद्यापर्यंत थांबावं लागेल बहुधा.

'नंदूने तो दिवस कसाबसा काढला.' देवळात जायची त्याला हिंमत झाली नाही.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे जीपमध्ये बसून नंदू घरी जायला निघाला.

ड्रायव्हर म्हणाला, "कालच एक बाई घरी परतल्या. त्या अमेरिकेत राहतात असं ऐकलं. साहेब, त्या बाई खूप धीराच्या आहेत. रात्री त्या देवळाच्या आसपास पुरुषमाणूसही फिरकत नाही. पण त्या बाई रात्री देवळात एकट्या काम करायच्या. आदिवासी म्हणतात, "त्या बाई देवळात भिंतीवर कोरलेल्या बायकांसारख्या दिसतात. त्या त्यांच्यातल्याच आहेत. म्हणून त्या बाईंना भीती वाटत नाही."

नंदू चमकला, "त्या बाईत आणि देवळातल्या पुतळ्यात साम्य आहे हे खरं." तो म्हणाला.

मग ड्रायव्हरने विचारलं, "काल रात्री तुम्ही देवळात गेला होता. तिथे तुम्हाला घाबरून चक्कर आली. तुम्ही का घाबरला?"

नंदूने सांगितलं, "मला साप दिसला."

ड्रायव्हर म्हणाला, "येवढचं ना! इथल्या सापांना घाबरायचं कारण नाही. आपण त्यांना त्रास दिला नाही तर ते आपल्याला चावत नाहीत. मात्र एखाद्या माणसाने सापाला किंवा त्यांच्यापैकी कुणाला इजा केली तर ते त्या माणसावर डूख धरतात. त्या माणसाची धडगत नसते."

नंदू थरथरायला लागला. पण मग त्याने विचार केला, "मी माझ्या घरी पोचल्यावर इथला साप येवढ्या लांब थोडाच येणार आहे?"

अकस्मात ड्रायव्हरने ब्रेक दाबला.

एक नाग सळसळत जीपच्या टपावरून ड्रायवर समोरच्या काचेवर उतरत होता. जीपच्या हुडवरती काचेसमोर त्याने वेटोळे घातलं आणि त्याच्या लाल मण्यासारख्या चमकत्या डोळ्यांनी जीपमध्ये बसलेल्या माणसांकडे बघत त्याने फणा काढला व जीपच्या काचेवर तो फुत्कार टाकू लागला.

**ललिता गंडभीर**

(पूर्वप्रसिद्धी पश्चिमगंध, १९८९.)

LALITA GANDBHIR
4200N.OCEAN DRIVE, 1501-2
RIVIERA BEACH,
FL 33404,USA.